# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २४५- २३** **दिनांक : - ०३/०८/२०२३**

## चोरी व जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन ९ गुन्हांची उकल मिरारोड पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या फिर्यादी नामे हेमंत गोपाळ गिजे,राह. रुम नं. ५०४ बि.नं. ३, साई एन्क्लेव्ह, साई कमल को ऑप हौसिंग सोसा, वागडनगर रोड, रामदेव पार्क, मिरारोड पुर्व हे दिनांक ३०/०७/२०२३ रोजी सायंकाळी १६.४० वाजता त्यांची पत्नी भाविका व मुलगा ध्रुव यांचेसह रिक्षाने मिरा भाईंदर रोडने काशिमिरा बाजुकडे प्रवास करत असतांना एस.के.स्टोन येथील कुसुम रोल्सजवळील सिग्नलच्या पुढे बस स्टॉपसमोर आलेवेळी रिक्षाचे पाठीमागुन दोन अनोळखी इसम मोटर सायकलवरुन येवुन फिर्यादी याची पत्नी भाविका यांची हॅण्ड बॅग जबरदस्तीने हिसकावुन पळवुन घेवुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I २८२/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी शोएब हनिफ खान सरगुरु वय ३७ वर्षे रा.रुम नं.२०२, अब्दुला अपार्टमेंट, दुसरा माळा, राशीद कम्पाऊंड, श्रीलंका, कौसा, मुंब्रा कौसा, ता.जि.ठाणे, मुळ रा.ए/१०३, नुरजहान पॅलेस, रशिद कम्पाऊंड, श्रीलंका, कौसा, मुंब्रा, ठाणे यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न करुन त्यास सदर गुन्हात अटक केली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याचेकडुन चोरी व जबरी चोरी केलेले एकुण ७ मोबाईल, १ चाकु व १ गुन्हयात वापरलेल्या मोटर सायकलचे आर.सी बुक तसेच रोख रक्कम हस्तगत करुन मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील २ गुन्हे व ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ७ गुन्हे, असे एकुण ९ गुन्हे उघड करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा तपास मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि.किरण वंजारी हे करीत आहेत.

### -:उघकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. कायदा व कलम |
|---|---|---|
| १. | मिरारोड पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २८२/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| २. | काशिमिरा पोलीस ठाणे | गु.रजि.नं. ५४१/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| ३. | चितळसर पोलीस ठाणे | गु.रजि.नं. १९५/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| ४. | चितळसर पोलीस ठाणे | गु.रजि.नं. १९६/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| ५. | कापुरबावडी पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २६७/२०२३ भा.द.वि.कलम ३९४, ३४ |
| ६. | कासारवडवली पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २६३/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| ७. | कासारवडवली पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २६४/२०२३ भा.द.वि.कलम ३७९,३४ |
| ८. | कासारवडवली पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २६२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९,३४ |
| ९. | कासारवडवली पोलीस ठाणे | गु.रजि.नं. २३२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ |

अटक आरोपी शोएब हनिफ खान सरगुरु हा सन २००८ पासुन चोरी व जबरी चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपी असुन त्याचेवर यापुर्वी इकडील तसेच मुंबई पोलीस आयुकतालय, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यात ०६ गुन्हे दाखल असल्याचा अभिलेख प्राप्त आहे.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड, श्री.महेश तरडे सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजयसिंह बागल, पोलीस निरीक्षक श्री.राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ.प्रशांत महाले, पो.हवा.प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, राहुल गावडे, पो.अमं.अथर्व देवरे यांनी केलेली आहे.



----ooo-----